



दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!






संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : ३२४ वा | शनिवार दि २१ मार्च २०२६ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये


# फडणवीसांच्या एका फोननंतर चक्र फिरली; शिवेंद्रराजेंची राजकीय खेळी; साताऱ्यात शिंदेंसह राष्ट्रवादीलाही धक्का...

**वृत्तसंस्था/सातारा**

सातारा जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडणुकीत शेवटच्या क्षणी नाट्यमय घडामोडी पाहायला मिळाल्या. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर प्रथमच सातारा जिल्हा परिषदेवर भाजपने आपला झेंडा फडकवला आहे. विशेष म्हणजे जिल्हा परिषदेत सत्ता आणण्यासाठी लागणारे संख्याबळ सोबत नसतानाही भाजपने ही किमया साधली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा फोन आणि त्यानंतर जिल्हा पातळीवर नेत्यांनी आखलेल्या रणनीतीमुळे भाजपने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीला शह दिल्याची चर्चा जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात रंगत आहे. सातारा जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या ६५ जागा असल्याने बहुमतासाठी ३३ जागांची आवश्यकता होती. मात्र भाजपच्या २८ जागा निवडून आल्या होत्या. तर दुसरीकडे राष्ट्रवादीनं २० आणि शिंदेंच्या शिवसेनेनं १५ जागांवर विजय मिळवलेला होता. या दोन्ही पक्षांनी आघाडी करण्याचा निर्णय घेतल्याने भाजपविरोधात या आघाडीचे संख्याबळ ३५ पर्यंत जात होते. त्यामुळे अध्यक्षपदाच्या निवडणुकीत भाजपचा पराभव नक्की मानला जात होता. परंतु २८ सदस्यांपर्यंतचे मर्यादित संख्याबळ असताना असतानाही भाजपने बहुमतासाठी लागणारा जादुई आकडा गाठला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या फोननंतर भाजप नेते आणि राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी अचूक रणनीती आखली आणि अतिरिक्त पाठिंबा मिळवत एकूण ३३ सदस्यांचा पाठिंबा भाजपाच्या बाजूने उभा केला. त्यामुळे सत्तेची समीकरणे बदलली आणि जिल्हा परिषदेवर भाजपचा झेंडा फडकला. बहुमत प्राप्त केल्याने भाजपच्या प्रिया शिंदे यांची सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी निवड, तर उपाध्यक्षपदी भाजपच्याच राजू भोसले यांची निवड निश्चित झाली. दरम्यान, या राजकीय नाट्यानंतर सातारा जिल्हा परिषदेत पहिल्यांदाच भाजपाचा भगवा फडकला असून, यामुळे आगामी काळात जिल्ह्यातील राजकीय समीकरण बदलण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



# शंकरशेठ ठरला हैवान विश्वासाचा केला विश्वासघात पोक्सोखाली गुन्हा दाखल...

**जनसंचलन/बुलढाणा**

शहरातून एक धक्कादायक आणि संतापजनक घटना समोर आली असून, पालकांच्या सतर्कतेमुळे अल्पवयीन मुलीच्या विनयभंगाचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे.७० वर्षीय वृद्धाविरुद्ध पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बुलढाणा शहर पोलीस स्टेशन हद्दीत ही घटना घडली.स्थानिक नागरिकांच्या मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी तात्काळ हालचाल करत प्रकरणाची दखल घेतली.त्यानंतर फिर्यादी यांनी अधिकृत तक्रार दाखल केली. आरोपी शंकर मंगतानी (वय ७०), बुलढाण्यातील एक व्यापारी असून तो पीडित मुलीच्या व त्याच्या घरच्यांच्या ओळखीचाच आहे. आरोपी आणि पीडित कुटुंबामध्ये पूर्वीपासून येणं-जाणं असल्याने विश्वासाचे नाते होते.मात्र, याच विश्वासाचा गैरफायदा घेत आरोपीने मुलगी एकटी असताना तिच्याशी अश्लील वर्तन करत विनयभंग केल्याचा आरोप आहे. त्यानंतर पीडित मुलीनेही हा प्रकार आपल्या पालकांना सांगितला आणि कुटुंबीयांनी पोलीस स्टेशन गाठून तक्रार दिली. या गंभीर प्रकरणात पोलिसांनी भारतीय न्याय संहिता () अंतर्गत कलम ६४(२)(), ६६, ६५(१), ७५(१) तसेच पोक्सो कायद्यांतर्गत कलम ४ आणि ६ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक सुधा पाटील या करत आहेत.दरम्यान,पालकांच्या जागरूकतेमुळेच हा प्रकार उघडकीस आल्याची चर्चा असून,समाजात वावरणाऱ्या या अश्या नराधम आरोपीवर कठोरात कठोर कारवाईची मागणी जोर धरत आहे.



# विधानसभांचे घमासान




एप्रिल महिन्यात देशातील पाच राज्यांमध्ये विधानसभा निवडणुकांचे बिगुल वाजले आहे. पश्चिम बंगाल, आसाम, केरळ आणि तमिळनाडू तसेच पुदुच्चेरी या ठिकाणी ९ ते २९ एप्रिल दरम्यान मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. ४ मे रोजी या निवडणुकांचे निकाल जाहीर होतील. या निवडणुकांमध्ये सत्ताधारी भाजप, काँग्रेस आणि इतर प्रादेशिक पक्षांचे भवितव्य ठरणार आहे. आसाम आणि पुदुच्चेरी वगळता इतर तीन राज्यांमध्ये भाजपची सत्ता नाही, त्यामुळे या राज्यांमध्ये आपला प्रभाव वाढवणे हे भाजपचे मुख्य उद्दिष्ट आहे. पश्चिम बंगालमध्ये भाजप तृणमूल काँग्रेसला जोरदार टक्कर देत आहे, तर तृणमूल काँग्रेसही त्यांना चोख प्रत्युत्तर देत आहे. केरळ, तमिळनाडू आणि पश्चिम बंगालमध्ये सध्या सत्तेवर असलेल्या प्रादेशिक पक्षांचा प्रभाव कायम राहणार की राष्ट्रीय पक्षांना पुन्हा यश मिळणार, हे देशाच्या राजकारणाची दिशा ठरवण्यासाठी महत्त्वाचे ठरेल. पश्चिम बंगालमधील निवडणुकांकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. मतदार यादीच्या पडताळणीवरून () सुरू झालेला वाद आणि राष्ट्रपतींच्या दौऱ्यावरून झालेले आरोप-प्रत्यारोप यामुळे हे राज्य राजकीय चर्चेचे केंद्र बनले आहे. गेल्या काही निवडणुकांमध्ये पश्चिम बंगालमध्ये भाजपचा लोकसभेतील आलेख उंचावला असला तरी विधानसभेत त्यांना यश मिळालेले नाही. सलग १५ वर्षे सत्ता टिकवून असलेल्या ममता बॅनर्जी यंदाही बंगाली अस्मितेचा मुद्दा पुढे करत आहेत. काँग्रेस आणि डावे पक्ष सध्या बंगालमध्ये फारसे प्रभावी नाहीत. मात्र, हेच पक्ष केरळमध्ये एकमेकांविरुद्ध लढताना दिसत आहेत. केरळमध्ये दर निवडणुकीत सत्ता बदलण्याची परंपरा गेल्या निवडणुकीत खंडित झाली होती. त्यावेळी डाव्या आघाडीने () सलग दुसऱ्यांदा सत्ता मिळवली होती. मात्र, त्यानंतरच्या काळात परिस्थिती बदलली आहे. नुकत्याच झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये काँग्रेसप्रणित डूफ आघाडीने मोठे यश मिळवले आहे. त्यामुळे विधानसभेच्या निवडणुकीतही त्यांच्या आशा वाढल्या आहेत. तिरुअनंतपुरम महापालिकेत सत्ता मिळवणाऱ्या भाजपचे लक्ष मतांची टक्केवारी वाढवण्यावर आणि काही जागा जिंकण्यावर असेल. आसामचे राजकारण सध्या ध्रुवीकरणाच्या दिशेने झुकलेले दिसत आहे. मुख्यमंत्री हेमंता बिश्व सरमा ड्डहिंदू-मुस्लिमम वादाला खतपाणी घालत असल्याचे दिसून येते. दुसरीकडे, काँग्रेसने गौरव गोगोई यांच्यासाठी प्रियंका गांधी यांच्यावर उमेदवार निवडीची जबाबदारी सोपवून निवडणूक प्रतिष्ठेची केली आहे. तमिळनाडूमध्ये काँग्रेस आणि भाजप हे दोन्ही राष्ट्रीय पक्ष अनुक्रमे द्रविड मुन्नेत्र कळघम () आणि अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम () यांच्या पाठिंब्यावर आपले राजकारण करत आहेत. यंदाही हेच चित्र कायम असले तरी अभिनेता थलपती विजय आणि नव्याने राजकारणात आलेल्या शशिकला यांच्यामुळे मतांमध्ये किती फरक पडतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. एकंदरीत, भाजपसाठी आसामची सत्ता टिकवणे आणि पश्चिम बंगालमध्ये पर्याय निर्माण करणे हे महत्त्वाचे आहे. तर काँग्रेससाठी केरळमध्ये सत्ता मिळवणे आणि आसाममध्ये आव्हान उभे करणे हे ध्येय आहे. केरळ गमावल्यास डाव्या आघाडीला देशातून इतिहासजमा होण्याची भीती आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत पिछेहाट झाल्यामुळे भाजप केंद्रातील स्पष्ट बहुमतापासून दूर राहिला होता. मात्र, त्यानंतर त्यांनी महाराष्ट्र, हरियाणा, बिहार आणि दिल्लीमध्ये पुन्हा मुसंडी मारली. आता केरळ आणि आसाममध्ये चांगली कामगिरी केल्यास विरोधकांच्या आशा पुन्हा वाढतील. तृणमूल काँग्रेस, द्रमुक आणि अण्णा द्रमुक यांसारख्या प्रादेशिक पक्षांचे लक्ष आपापल्या राज्यांमध्ये आपले स्थान टिकवून ठेवण्यावर आहे. पश्चिम बंगालमध्ये गेल्या अनेक निवडणुकांमध्ये राजकीय हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर मतदान सहा-सात टप्प्यांमध्ये होत असे. यंदा आयोगाने दोनच टप्प्यांमध्ये मतदान घेण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा काय परिणाम होतो, हे पाहणेही महत्त्वाचे ठरेल. भाजप आणि तृणमूल काँग्रेस यांच्यातील राजकीय संघर्ष पश्चिम बंगालमध्ये तीव्र झाला आहे. या संघर्षात मतदार कोणाला कौल देणार, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. केरळमध्ये डाव्या आघाडीला सलग दुसऱ्यांदा सत्ता मिळवण्याचा अनुभव आहे, पण यावेळी काँग्रेसच्या वाढत्या प्रभावामुळे त्यांना आव्हान पेलावे लागणार आहे. तमिळनाडूमध्ये प्रादेशिक पक्षांचे वर्चस्व कायम राहणार की राष्ट्रीय पक्ष आपले स्थान निर्माण करतील, हे पाहणेही रंजक ठरेल. पुदुच्चेरीमध्येही राजकीय घडामोडींना वेग आला आहे. या सर्व निवडणुकांचा निकाल देशाच्या राजकारणावर दूरगामी परिणाम करणारा ठरू शकतो.






The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# 'जग लाडकी' जहाज गुजरातमध्ये दाखल

## युएईमधून ८०८८६ मेट्रिक टन कच्चे तेल पोहोचले भारतात..

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारतीय ध्वज असलेले तेलवाहू जहाज 'जग लाडकी' गुजरातच्या मुंद्रा येथील अदानी पोर्टवर दाखल झाले आहे. ते संयुक्त अरब अमिरातीच्या (युएई) फुजैरा बंदरातून होर्मुझची सामुद्रधुनी ओलांडून आले आहे. या जहाजात 80,886 मेट्रिक टन (अंदाजे 5.80 ते 6.0 लाख बॅरल) कच्चे तेल आहे. भारताला दररोज अंदाजे 5.5-5.6 दशलक्ष बॅरल (अंदाजे 90 कोटी लिटर) तेलाचा वापर होतो.

'जग लाडकी' हे कार्गो जहाज संयुक्त अरब अमिरातीमधील फुजैरा बंदरावर तेलसाठा भरून पाठण्यात आले आहे. या जहाजाची लांबी 274.19 मीटर आणि रुंदी 50.04 मीटर आहे. या टँकरचे डेडवेट टनेज (एकूण भार वाहून नेण्याची क्षमता) अंदाजे 1,64,716 टन आणि ग्रॉस टनेज अंदाजे 84,735 टन आहे.

भारतात यापूर्वी 16 आणि 17 मार्च रोजी दोन भारतीय ध्वजांकित एलपीजी वाहक जहाजे दाखल झाली होती. भारतात दाखल होण्यापूर्वी होर्मुझच्या सामुद्रधुनीतून सुरक्षितपणे ती पार झाली होती. एमटी शिवालिक आणि एमटी नंदा देवी या जहाजांमधून अंदाजे 92,712 मेट्रिक टन एलपीजी घेऊन होर्मुझच्या सामुद्रधुनीतून प्रवास केला होता. आपल्या व्यावसायिक हितांचे रक्षण करण्यासाठी, भारत 'ऑपरेशन संकल्प' अंतर्गत या प्रदेशातील पाण्यात सतत नौदल उपस्थिती राखतो. हा उपक्रम महत्त्वाच्या सागरी मार्गांचे संरक्षण करण्यासाठी आणि 'जग लाडकी'सारख्या जहाजांना सुरक्षित मार्ग मोकळा करून देण्याची खात्री करण्यासाठी समर्पित आहे.




**'ऑपरेशन संकल्प'ला मोठे यश**

### संयुक्त राष्ट्रांची सागरी संघटना बैठक घेणार

संयुक्त राष्ट्रांची सागरी संघटना (आयएमओ) आखाती प्रदेशातील परिस्थितीवर लवकरच एक तातडीची बैठक घेणार आहे. युद्धामुळे जहाजे आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेला धोका निर्माण झाल्याने ही बैठक बोलावण्यात आली आहे. या बैठकीत अनेक देश सहभागी होणार असून, मोठे निर्णय घेतले जाण्याची शक्यता आहे. इराणचे हल्ले आणि होर्मुझची सामुद्रधुनी बंद करण्याच्या प्रयत्नांचा निषेध व्हावा, अशी ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी आणि आखाती देशांची इच्छा आहे. दरम्यान, जपान, पनामा, सिंगापूर आणि संयुक्त अरब अमिरातीसारख्या देशांना अडकलेली जहाजे आणि खलाशी यांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठी एक योग्य योजना तयार व्हावी असे वाटते. दुसरीकडे, या परिस्थितीसाठी अमेरिका आणि इस्रायल जबाबदार असल्याचे इराणचे म्हणणे आहे. समुद्रातील वाढलेल्या धोक्याला इस्रायल आणि अमेरिका कारणीभूत असल्याचा आरोप इराणने वेळोवेळी केलेला आहे.

## महानगरपालिकांनाही प्लास्टिक फुलांच्या बाजारावर कारवाईचे अधिकार

**मुंबई/वृत्तसंस्था :** पंराज्यात प्लास्टिक बंदी अस्तित्वात असली तरी बाजारपेठेत कृत्रिम (प्लास्टिक) फुलांचा वाढता वापर शेतकऱ्यांच्या नैसर्गिक फुलांच्या व्यवसायावर परिणाम करत आहे. प्लास्टिक फुलांच्या बंदीसाठी विशेष सूचना काढण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

याबाबत सदस्य प्रविण दरेकर यांनी प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य शशिकांत शिंदे, अमित गोरखे, अमोल मिटकरी, सदाभाऊ खोत, अनिल परब यांनी उपप्रश्न उपस्थित केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, प्लास्टिक बंदीच्या विद्यमान अधिसूचनेअंतर्गतच विशेष अधिसूचना काढून प्लास्टिक व कृत्रिम फुलांच्या वापरावर बंदी घालण्यात येईल. महानगरपालिकांना अशा प्रकारच्या बाजारपेठांवर कारवाई करण्याचे अधिकार दिले जाणार असून, प्लास्टिक फुलांचा वापर करणाऱ्या डेकोरेशन व्यावसायिक, बँक्वेट हॉल्स आणि इतर संबंधित घटकांनाही नोटिस दिली जाईल. नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.




याबाबत अधिक माहिती देताना मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, महाराष्ट्र प्लास्टिक व थर्माकोल बंदी अधिसूचना २०१८ नुसार सजावटीसाठी वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक आणि थर्माकोलवर पूर्णतः बंदी आहे. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने २९ ऑगस्ट २०२५ रोजी सण-उत्सव काळात कृत्रिम फुलांचा वापर टाळण्याबाबत परिपत्रक जारी केले आहे. एप्रिल २०२५ ते जानेवारी २०२६ या कालावधीत १,२४,७८३ आस्थापनांची तपासणी करण्यात आली यापैकी ३,३९० आस्थापनांवर कारवाई करण्यात येऊन १.५५ कोटी दंड वसूल करण्यात आला असून ६७.५४ मेट्रिक टन एकल वापर प्लास्टिक जप्त करण्यात आले आहे.

## 'तीर्थ विठ्ठल, क्षेत्र विठ्ठल' कॉफीटेबल बुकचे हस्ते प्रकाशन

**मुंबई/वृत्तसंस्था :** 'तीर्थ विठ्ठल, क्षेत्र विठ्ठल' कॉफीटेबल बुकचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वर्षा निवासस्थानी प्रकाशन करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ साहित्यिका अरुणा ढेरे, ज्येष्ठ गायिका पद्मश्री डॉ.अश्विनी भिडे-देशपांडे, कॉफीटेबल बुकचे निर्मिते विनोद पवार, माजी खासदार विनय सहस्त्रबुद्धे, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे तसेच शिष्टमंडळातील सदस्य उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, अतिशय सुंदर अशा कॉफी टेबल बुकचे प्रकाशन करता आले याबद्दल अतिशय आनंद आहे. महाराष्ट्राचे प्रतिबिंब हे आपल्याला आपल्या वारीमध्ये दिसते, ते पंढरपुरात दिसते, ते विठ्ठलाच्या आराधनेत आपल्याला पाहायला मिळते. इतक्या वेगवेगळ्या कथा, प्रत्येक वारीमध्ये तयार होतात. ते सर्व कॉफी टेबल बुकच्या माध्यमातून आपल्याला अनुभवता येणार आहे. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, तीर्थ आणि त्या तीर्थातला जो देव आहे, हे दोन्ही महत्त्वाचे आहेत. त्याची माहिती, इतिहास किंवा त्यातल्या प्रमुख गोष्टी या कॉफी टेबल बुकच्या माध्यमातून मिळाले. माहिती आणि छायाचित्रे यामुळे हे कॉफी टेबल बुक संग्रहणीय झाले आहे. आपली सांस्कृतिक माहिती जर कोणाला द्यायची असेल, तर काय द्यावे तर यामध्ये या पुस्तकाचा समावेश झाला आहे. इंटॅन्जिबल हेरिटेजमध्ये युनेस्कोला आता ही पंढरीची वारी सादर करण्यात येईल.

## नोएडा विमानतळाचे २८ रोजी उद्घाटन

**गुवाहाटी/नोएडा :** पंतप्रधान नरेंद्र मोदी 28 मार्च रोजी नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन करतील. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी बुधवारी आपल्या सरकारच्या नऊ वर्षांच्या यशस्वी कार्यकाळाच्या पूर्तिनिमित्त आयोजित एका समारंभात ही घोषणा केली. या माध्यमातून देशातील सर्वात मोठ्या आंतरराष्ट्रीय विमानतळाची प्रतीक्षा आता संपणार आहे. राज्यात सध्या 16 देशांतर्गत आणि चार आंतरराष्ट्रीय विमानतळे आहेत. नोएडा-जेवर येथील विमानतळ हे राज्यातील पाचवे आणि देशातील सर्वात मोठे आंतरराष्ट्रीय विमानतळ ठरणार आहे. जेवर विमानतळाला उत्तर प्रदेशच्या अर्थव्यवस्थेसाठी 'गेम-चेंजर' संबोधून मुख्यमंत्र्यांनी यातून भविष्यात 1 लाख कोटी रुपयांचा महसूल मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या उपस्थिती बुधवारी सरकारच्या नऊ वर्षांच्या कार्यकाळातील कामगिरीचा तपशील देणाऱ्या एका पुस्तकाचेही प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, गेल्या नऊ वर्षात राज्यात झालेले सर्व बदल हे पंतप्रधान मोदींचे मार्गदर्शन आणि कार्यकर्त्यांच्या मेहनतीचे फळ आहे. कायदा आणि सुव्यवस्थेवर भर देताना ते म्हणाले की, आज रमजानचा महिना आहे. लवकरच ईद येणार आहे, तरीही कुठेही अशांतता किंवा दंगलीची भीती नाही. हेच सुशासन आहे. 2017 पूर्वी पोलीस भरती थांबली होती, परंतु त्यांच्या सरकारने पारदर्शकपणे 2.19 लाख पोलीस कर्मचाऱ्यांची भरती केली आहे आणि सध्या 60,240 कर्मचारी प्रशिक्षण घेत असल्याचेही ते म्हणाले.




मागील सरकारांवर टीका करताना ते म्हणाले की, काही लोक नोएडाला जायला घाबरत होते, पण त्यांच्या सरकारने तिथे जाऊन गुंतवणुकीचे वातावरण निर्माण केले. आज देशातील 55 टक्के मोबाईल फोन नोएडामध्ये तयार होतात. उत्तर प्रदेशात आता 16 देशांतर्गत आणि 5 आंतरराष्ट्रीय विमानतळांचे जाळे असून, जेवर हे पाचवे आणि सर्वात मोठे विमानतळ होणार असल्याचा सरकार अभिमान आहे, असेही ते पुढे म्हणाले.

# आसाम निवडणुकीपूर्वी खासदार प्रद्युत बोरदोलोई यांचा भाजपमध्ये प्रवेश



**गुवाहाटी/वृत्तसंस्था :** आसाममधील विधानसभा निवडणुकीच्या धामधुमीत काँग्रेस पक्षाला मोठा धक्का बसला आहे. नागावचे लोकसभा खासदार आणि पक्षाचा एक अत्यंत विश्वासू चेहरा असलेले प्रद्युत बोरदोलोई यांनी अचानक आपल्या पदाचा आणि सदस्यत्वाचा राजीनामा देऊन सर्वांना आश्चर्यचकीत केले आहे. बुधवारी त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला असून विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर आता काँग्रेसमध्ये खळबळ उडाली आहे. पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांना लिहिलेल्या पत्रात त्यांनी आपली खदखद व्यक्त केली आहे. त्यांचा हा राजीनामा एका रात्रीत घेतलेला निर्णय नसून दीर्घकाळापासून खदखदत असलेल्या असंतोषाचे कारण असल्याचे दिसते.

प्रद्युत बोरदोलोई यांचे काँग्रेस पक्षासोबतचे संबंध केवळ काही वर्षांचे नसून, अनेक दशकांचे आहेत. ते वयाच्या 16 व्या वर्षी विद्यार्थी राजकारणाच्या माध्यमातून पक्षात सामील झाले होते. 1998 मध्ये मार्गेरिटा मतदारसंघातून आमदार म्हणून आपल्या संसदीय कारकिर्दीला सुरुवात करणाऱ्या बोरदोलोई यांनी तरुण गोगोई यांच्या सरकारमध्ये 15 वर्षे मंत्री म्हणून महत्त्वाच्या पदांवर काम केले. 2019 मध्ये नागाव लोकसभा जागा जिंकल्यावर ते अप्पर आसाममधील काँग्रेस पक्षाचा सर्वात मजबूत आधारस्तंभ बनले होते. आता बोरदोलोई यांनी पक्ष नेतृत्वावर गंभीर आरोप करत पक्षातच गुन्हेगारांना आश्रय दिल्याचा आरोप केला आहे. त्यांनी थेट आमदार आसिफ नझर यांना लक्ष्य केले आहे.

आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी बोरदोलोई यांना भाजपमध्ये सामील होण्याचा प्रस्ताव दिला होता. बोरदोलोई भाजपमध्ये सामील झाल्यानंतर आता नागाव आणि आसपासच्या परिसरातील निवडणुकीची समीकरणे पूर्णपणे बदलू शकतात. त्यांचा तळागाळातील प्रभाव इतका मजबूत असल्याने त्यांच्या पक्षबदलामुळे काँग्रेसचे कार्यकर्ते पूर्णपणे विस्कळीत होऊ शकतात. तसेच आसामच्या सार्वत्रिक निवडणुकीत आता एक नवीन वळण येऊ शकते.

# दादा, माझ्या भावाला सोडा', नागेशच्या बहिणीने सांगितली आपबिती, कठोर कारवाईची मागणी

**पुणे :** कोथरूडमध्ये प्रेम प्रकरणातून २३ वर्षीय नागेश जाधवची झालेली निर्घृण हत्या केवळ एका तरुणाचा जीव घेऊन थांबलेली नाही, तर एका गरीब कुटुंबाचा आधारच हिरावून गेला आहे. घरातील एकमेव कमावता मुलगा असलेला नागेश आई आणि आजीचा आधार होता. त्याच्या कमाईवरच घर चालत होते. मात्र आता नागेशच्या मृत्यूनंतर त्याची आई अक्षरशः एकटी पडली असून संपूर्ण कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. कोथरूड परिसरात घडलेल्या या घटनेत नागेश जाधव याला अल्पवयीन मुलीच्या मोबाईलवरून मेसेज करून बोलावण्यात आले. त्यानंतर मुलीच्या घरच्यांनी नागेशला घेरत बांबू, लाथाबुक्क्यांनी अमानुष मारहाण केली. या मारहाणीत नागेशचा मृत्यू झाला. या





प्रकरणी पोलिसांनी दहा जणांवर गुन्हा दाखल केला असून त्यापैकी नऊ जणांना अटक करण्यात आली आहेनागेशच्या कुटुंबीयांनी सांगितले की, दोन वर्षांपूर्वी नागेश आणि त्या अल्पवयीन मुलीचे प्रेम संबंध होते. त्यावेळीही वाद झाले होते आणि प्रकरण पोलीस चौकीपर्यंत गेले होते. त्यानंतर कुटुंबीयांनी नागेशचे सिम कार्ड तोडून टाकले आणि दोघांमधील संपर्क पूर्णपणे बंद झाला होता. नागेशही दुसरीकडे काम करू लागला होता. मात्र अचानक घटनेच्या दिवशी मुलीच्या मोबाईलवरून त्याला मेसेज आला आणि तो तिला भेटण्यासाठी गेला.नागेशच्या बहिणीने सांगितले की, ङ्कमी नागेशला व्हिडिओ कॉल केला होता. त्या वेळी तो काळा-निळा झाला होता. त्याला प्रचंड मारहाण होत होती. मी त्यांना 'दादा, माझ्या भावाला सोडा' अशी विनंती करत होते, पण त्यांनी ऐकले नाही. ते त्याला मारतच राहिले.ङ्घ

त्या प्रकरणात नागेशचा कोणताही संबंध नव्हता, हे आम्ही वारंवार सांगत होतो. तरीही त्यांनी नागेशचा जीव घेतला,ङ्घ असा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. नागेशला मारहाण झाल्यानंतर जवळपास अर्धा ते पाऊण तास त्याला कुटुंबीयांच्या ताब्यात दिले गेले नाही, तसेच त्याला तातडीने रुग्णालयातही नेण्यात आले नाही, असा आरोपही नातेवाईकांनी केला आहे.दरम्यान, नागेशच्या मृत्यूनंतर त्याच्या घरात शोककळा पसरली आहे. वडिलांचे आधीच निधन झाले असून दोन बहिणींचे लग्न झाले आहे. घरात फक्त आई आणि आजी आहेत. घर चालवण्याची जबाबदारी पूर्णपणे नागेशवरच होती. त्यामुळे आता ङ्कआईचा सांभाळ कोण करणार? तिचं पुढचं आयुष्य कसं जाणार? असा प्रश्न कुटुंबीय उपस्थित करत आहेत. या प्रकरणात आरोपींना कठोर शिक्षा देण्याची मागणी करत ङ्कआम्हाला जिवाच्या बदल्यात जीव हवा. मुलीसह सर्व आरोपींना फाशीची शिक्षा द्या, अशी मागणी नागेशच्या कुटुंबीयांनी केली आहे.

## जामखेड गोळीबार प्रकरणाला नवे वळण

**पुणे :** जामखेड येथे ९ मार्च रोजी घडलेल्या गोळीबाराच्या घटनेत गंभीर जखमी झालेल्या पैलवान सागर मोहोळकर याचा अखेर उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. पुण्यातील ससून रुग्णालयात त्याच्यावर मागील काही दिवसांपासून उपचार सुरू होते. मात्र प्रकृती चिंताजनक असल्याने डॉक्टरांचे प्रयत्न अपयशी ठरले आणि मोहोळकर याने अखेरचा श्वास घेतला. या घटनेमुळे पुन्हा एकदा परिसरात खळबळ उडाली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड शहरात ९ मार्च रोजी सागर मोहोळकर याच्यावर अज्ञात हल्लेखोरांनी गोळीबार केला होता. या हल्ल्यात तो गंभीर जखमी झाला होता. त्याला तातडीने उपचारासाठी पुण्यातील ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. गेल्या काही दिवसांपासून त्याच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू होते.या प्रकरणाचा तपास करताना अहिल्यानगरच्या स्थानिक गुन्हे शाखेने तपासाची चक्रे वेगाने फिरवली. पोलिसांनी पुण्यातील एका संशयिताला ताब्यात घेतले असून त्याची सध्या कसून चौकशी सुरू आहे. या गोळीबारामागे कोणाचा हात आहे आणि



नेमका वाद कशामुळे झाला? याचा शोध पोलीस घेत आहेत.तपासादरम्यान काही धागेदोरे पुण्यापर्यंत पोहोचले असल्याचे समोर आले आहे. या प्रकरणात चार्ली उर्फ माऊली उर्फ ज्ञानेश्वर साठे, रोहित विठ्ठल आखाडे आणि 'चिन्या' नावाने ओळखला जाणारा आरोपी यांची नावे पुढे आली आहेत. पोलिसांनी दोन संशयितांना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून एक गावठी कट्टा आणि जिवंत काडतूस जप्त करण्यात आले आहे.,दरम्यान, सागर मोहोळकर हा काही दिवसांपासून चर्चेत आला होता. धाराशिव जिल्ह्यातील भूम तालुक्यात एका जत्रेदरम्यान त्याने कुख्यात गुंड निलेश घायवळ याच्या कानाखाली मारल्याची घटना घडल्याचे सांगितले जाते. त्या घटनेनंतर दोघांमध्ये वाद निर्माण झाला होता, अशी चर्चा होती.

## दुपार झाली तरी दार बंद, शेजाऱ्यांनी दरवाजा तोडला तर दाम्पत्याची बॉडी आढळली ; PM रिपोर्टमध्ये मोठी माहिती

**सोलापूर :** सोलापूर शहरातील स्वागतनगरकडे जाणाऱ्या रस्त्यालगतच्या कृष्णानगर येथे महादेव नरसप्पा मंचाळ (वय ६८) आणि त्यांच्या पत्नी रंगम्मा मंचाळ (वय ६२) या वृद्ध दाम्पत्याची हत्या झाल्याची घटना घडली आहे. दुहेरी हत्येच्या या घटनेनं सोलापुरात मोठी खळबळ उडाली आहे. श्वासोच्छवास रोखून वृद्ध पती-पत्नीची हत्या करण्यात आल्याचा एमआयडीसी पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे. जागेच्या वादातून मंचाळ यांच्या भावकीत मागील अनेक दिवसांपासून टोकाचा वाद सुरु होता. त्यावरुन ही हत्या झाली असल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे. मात्र, पोलिसांनी सखोल तपास सुरू केला असून आणखी आरोपी निष्पन्न झाला नाहीय. काल रविवारी रोजी रात्री उशीरापर्यंत एमआयडीसी पोलीस ठाण्यात अज्ञात कारण व व्यक्ती यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.कृष्णानगरमध्ये काल रविवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास दुहेरी हत्याकांडाची घटना उघडकीस आली आहे. दररोज सकाळपासून दिसणारी मंचाळ आजी दुपार झाली तरी दिसत नव्हती. मंचाळ दाम्पत्याने दुपार झाली तरी दरवाजा का उघडला नाही, अशी शंका आल्यानंतर शेजाऱ्यांनी दार ठोठावून पाहिलं. मात्र, आतून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे आजूबाजूच्या शेजाऱ्यांची शंका अधिकच बळावली. पुढच्या काही क्षणात शेजाऱ्यांनी मंचाळ यांच्या घराचा दरवाजा तोडून पाहिलं असता महादेव मंचाळ आणि त्यांच्या पत्नी रंगम्मा मंचाळ हे वृद्ध दाम्पत्य मृतावस्थेत दिसलं. हे दृश्य पाहून शेजाऱ्यांच्या पायाखालची जमीन सरकली.घटनेची माहिती मिळताच, एमआयडीसी पोलिसांचा फौजफाटा घटनास्थळी दाखल झाला. पोलीस निरीक्षक विजय



खोमणे आणि त्यांच्या टीमने घटनेचा पंचनामा करुन दोघांचे मृतदेह येथील शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवले. काल रविवारी सांयकाळनंतर मृतदेह अंत्यसंस्कारसाठी नातेवाईकांच्या ताब्यात दिल्याचं पोलीस सुत्रांकडून सांगण्यात आलं.मृत महादेव मंचाळ आणि त्यांची पत्नी रंगम्मा मंचाळ यांच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले. शवविच्छेदनाचा प्राथमिक अहवाल पोलिसांना प्राप्त झाला असून दोघांचा श्वासोच्छवास रोखण्यात आला होता आणि, त्यातून त्यांचा गुदमरुन मृत्यू झाला, असं या अहवालात नमूद करण्यात आलं आहे.महादेव आणि त्यांच्या पत्नी रंगम्मा यांचा श्वासोच्छवास रोखला गेला होता. यातच त्यांचा मृत्यू झाला आहे, असं शवविच्छेदन अहवालात नमूद केलं आहे. वृद्ध मंचाळ पती पत्नीचा श्वास नेमका रोखला कोणी? तोंडावर उशी किंवा अन्य काही ठेवले का? हे कृत्य कोणी केलं असावं? यादृष्टीने एमआयडीसी पोलिसांचा तपास सुरु आहे.

# विद्यार्थ्याने आयुष्य संपवलं, चिठ्ठीत मैत्रिणीचा उल्लेख, पाच जणांवर गुन्हा

**राजकोट :** राजकोटमध्ये असलेल्या गुजरात येथील एकमेव एम्स रुग्णालयातील इंटर्न डॉक्टरने आयुष्याची अखेर केल्याचा प्रकार समोर आला आहे. एमबीबीएसच्या शेवटच्या वर्षाचे शिक्षण घेणाऱ्या २६ वर्षीय रतन कुमार मेघवाल याने जीव दिल्याचा आरोप आहे. मृत्यूपूर्वी लिहिलेल्या शेवटच्या चिठ्ठीत त्याने पाच सहविद्यार्थ्यांच्या शारीरिक आणि मानसिक त्रासाला कंटाळून टोकाचं पाऊल उचलत असल्याचा उल्लेख केला आहे. रतन कुमारचे पिता मोहनलाल मेघवाल यांनी गांधीग्राम पोलिस स्टेशनमध्ये कलम १०८, ३(५) नुसार सर्व पाच विद्यार्थ्यांविरोधत तक्रार दाखल केली आहेरतनने यापूर्वी दोन वेळा जीव देण्याचा प्रयत्न केला होता. मानसिक आरोग्याच्या समस्यांमुळे त्याच्यावर मानसोपचार सुरु होते. त्याच्या शेवटच्या चिठ्ठीत सोबतच शिक्षण घेत असलेल्या एका विद्यार्थिनीचाही उल्लेख करण्यात आला आहे. न्यायालयाच्या आदेशाचे पालन करत पोलिसांनी पाचही इंटर्न डॉक्टरांना न्यायालयीन कोठडीत पाठवले आहे. राजस्थानच्या जैसलमेर जिल्ह्यातील फल्सुंद गावचे



रहिवासी असलेले रतन कुमारचे वडील मोहनलाल मेघवाल हे घड्याळ दुरुस्त करतात. त्यांचा मुलगा रतन कुमार मेघवाल गेल्या चार वर्षांपासून राजकोट येथील 'एम्स' रुग्णालयात एमबीबीएसचे शिक्षण घेत होता आणि सध्या तो अंतिम वर्षाचे शिक्षण घेत होता.१४ मार्च २०२६ रोजी पहाटे साधारण ४ वाजण्याच्या सुमारास जामनगर रस्त्यावरील 'घंटेश्वर २५ वारिया' जवळ असलेल्या रेल्वे रुळांवर धावत्या रेल्वेसमोर उडी घेऊन रतन कुमारने आयुष्याची अखेर केली. रेल्वे पोलिसांनी घटनास्थळावरुन रतन कुमारची बॅग जप्त केली; या बॅगेत एक मोबाईल फोन, एक टॅब्लेट आणि एक वही आढळून आली.एका वहीमधून हिंदी आणि इंग्रजी अशा दोन्ही भाषांमध्ये लिहिलेली १७ पानांची चिठ्ठी जप्त करण्यात आली आहे. त्यावरुन, रतनच्या वडिलांनी आरोप केला की, सततच्या छळामुळे आपल्या मुलाची मानसिक स्थिती खालावली आणि अखेरीस त्याला जीव देण्यास भाग पाडले. सध्या गांधीग्राम पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या संपूर्ण प्रकरणाचा तपास डउ/डढ कक्षाच्या अउझ यांच्याकडे सोपवण्यात आला आहे.पोलिसांनी चिठ्ठीत उल्लेख असलेल्या त्या पाच वैद्यकीय विद्यार्थ्यांना अटक केली आहे. याव्यतिरिक्त, या चिठ्ठीमध्ये एका मैत्रिणीचाही उल्लेख आहेङ्घजी रतन आणि आरोपी या दोघांचीही कॉमन मैत्रीण आहे. ती देखील सध्या एमबीबीएसचे शिक्षण घेत आहे. हे सर्वजण 'व्हॉट्सअॅप' मेसेजच्या माध्यमातून एकमेकांशी संवाद साधत असत. पाच आरोपींपैकी तीन जण राजस्थानचे, एक जण हरियाणाचा आणि एक जण गुजरातमधीलच भरुचचा मूळ रहिवासी आहे.

# भारत चीनसोबत एकाच गटात

## थॉमस, उबर चषक स्पर्धांची गटवारी जाहीर; २४ एप्रिलपासून स्पर्धेचे डेन्मार्कमध्ये आयोजन

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** डेन्मार्कच्या हॉर्सेन्स येथे 24 एप्रिल ते 3 मे या कालावधीत होणाऱ्या 2026 च्या थॉमस आणि उबर चषकासाठी भारतीय पुरुष आणि महिला संघांचे गट बुधवारी जाहीर करण्यात आले. यामध्ये दोन्ही भारतीय संघांना गतविजेत्या चीनसोबत एकाच गटात स्थान मिळाल्याने त्यांच्यासमोर एक आव्हानात्मक परिस्थिती निर्माण झाली आहे.



संघातील खेळाडूंच्या जागतिक क्रमवारीच्या आधारे या स्पर्धेत दोन्ही भारतीय संघांना आठवे मानांकन देण्यात आले आहे. या गटवारीची घोषणा 'बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशन'ने बुधवारी केली. 2022 च्या थॉमस चषकाचे विजेते असलेल्या भारताला 'अ' गटातून उपांत्यपूर्व फेरीत पोहोचू शकणाऱ्या दोन संघांपैकी एक जागा मिळविण्याच्या दृष्टीने प्रबळ दावेदार मानले जात आहे. या गटात 'पॅन ॲम' विजेते कॅनडा आणि 'ओशेनिया' विजेते ऑस्ट्रेलिया यांचाही समावेश आहे.

मात्र, महिला संघासाठी बाद फेरीत पोहोचण्याचा मार्ग थोडा कठीण असणार आहे, कारण त्यांना 16 वेळा विजेतेपद पटकावणाऱ्या चीनसोबतच युरोपियन सांघिक अजिंक्यपद स्पर्धेतील उपविजेते डेन्मार्क आणि कांस्यपदकविजेते युक्रेन यांच्या गटात ठेवण्यात आले आहे. 'आम्हाला एक समाधानकारक गटवारी मिळाली आहे आणि थॉमस व उबर या दोन्ही स्पर्धांमध्ये उपांत्यपूर्व फेरीत पोहोचण्याची आम्हाला चांगली संधी आहे. आमचा संघ अत्यंत मजबूत आहे आणि त्यांनी हे सिद्ध केले आहे की, ज्या दिवशी त्यांचा खेळ बहरेल, त्या दिवशी ते कोणत्याही अव्वल संघाचा पराभव करू शकतात. एकदा का आम्ही उपांत्यपूर्व फेरीत पोहोचलो की, त्यानंतर काहीही शक्य आहे,' असे 'बॅडमिंटन असोसिएशन ऑफ इंडिया'चे सरचिटणीस संजय मिश्रा यांनी या प्रतिष्ठित सांघिक स्पर्धांच्या गटवारीवर प्रतिक्रिया देताना म्हटले.


भारतीय पुरुष संघाने 2022 च्या थॉमस चषकाचे विजेतेपद पटकावून इतिहास रचलेला असून महिला संघाने 2014 आणि 2016 च्या आवृत्त्यांमध्ये कांस्यपदक मिळवले होते. 2024 मध्ये झालेल्या मागील आवृत्तीच्या उपांत्यपूर्व फेरीत भारताला चीनकडून पराभव पत्करावा लागला होता. त्यापूर्वीच्या स्पर्धेत जपानकडून पराभूत झाल्यामुळे भारतीय महिला संघाला उपांत्यपूर्व फेरीतच स्पर्धेबाहेर पडावे लागले होते.

चीनकडे शी यू की (जागतिक क्रमवारीत दुसरा क्रमांक) आणि ली शी फेंग (सातवा क्रमांक) यासारख्या अत्यंत बलाढ्या पुरुष खेळाडूंची फळी उपलब्ध आहे तसेच त्यांच्या संघात वेंग हॉंग यांग (17 वा क्रमांक) आणि लू ग्वांग झू (18 वा क्रमांक) यांचाही समावेश आहे. मात्र, भारताला लक्ष्य सेनच्या अलीकडील कामगिरीमुळे नक्कीच आत्मविश्वास मिळेल. कारण पॅरिस ऑलिम्पिकच्या उपांत्य फेरीत पोहोचलेल्या लक्ष्य सेनने या महिन्याच्या सुऊवातीला झालेल्या 'ऑल-इंग्लंड अजिंक्यपद स्पर्धे'त उपविजेतेपद पटकावताना ली शी फेंगचा धक्कादायक पराभव केला होता.

2022 मध्ये भारताने बँकॉक येथे आपले पहिले थॉमस कप विजेतेपद पटकावून इतिहास रचला होता. अंतिम सामन्यात 14 वेळच्या विजेत्या इंडोनेशियावर 3-0 ने विजय मिळवून हा चषक उंचावणारा भारत हा केवळ सहावा देश ठरला होता. बॅडमिंटन आशिया सांघिक स्पर्धेनंतर बीडब्ल्यूएफ पुऊष सांघिक क्रमवारीत मिळालेल्या स्थानाच्या आधारे भारताने 2026 च्या थॉमस कपसाठी पात्रता मिळवली आहे. महिला संघानेही जागतिक क्रमवारीच्या आधारे उबर कपमधील आपले स्थान निश्चित केले आहे. एकूण 16 संघ प्रत्येकी चार संघांच्या चार गटांमध्ये विभागलेले असून ते साखळी फेरी खेळतील. त्यात प्रत्येक सामन्यात पाच लढती (तीन एकेरी आणि दोन दुहेरी) असतील. प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ उपांत्यपूर्व फेरीसाठी पात्र ठरतील.

## दुहेरीत हरिहरन-अर्जुन दुसऱ्या फेरीत

**अर्लीन्स/वृत्तसंस्था :** येथे सुरू असलेल्या अर्लीन्स मास्टर्स सुपर 300 बॅडमिंटन स्पर्धेत, भारताची पुरूष दुहेरी जोडी हरिहरन अमसकरुनन आणि एम. आर. अर्जुन यांनी उपांत्यपूर्व फेरीच्या दिशेने आगेकूच केली तर आकर्षी कश्यपने पात्रता फेरीत दोन विजय नोंदवत महिला एकेरीच्या मुख्य फेरीत प्रवेश मिळविला.




2025 मध्ये 'अल ऐन मास्टर्स सुपर 100', 'तुर्किये इंटरनॅशनल चॅलेंज' आणि 'तेलंगणा इंडियन इंटरनॅशनल चॅलेंज' या स्पर्धांत विजेत्या ठरलेल्या हरिहरन आणि अर्जुन या जोडीने, झेचियाच्या जिरी क्रॉल आणि ओन्ड्रेज क्रॉल यांच्यावर विजय मिळवला. झेचियाच्या या जोडीने पहिला गेम 10-21 ने गमावल्यानंतर सामन्यातून माघार घेतली. पुढील फेरीत या भारतीय जोडीचा सामना स्कॉटलंडच्या अलेक्झांडर डन आणि ॲडम प्रिंगल यांच्याशी होईल.

तत्पूर्वी जागतिक क्रमवारीत 63 व्या क्रमांकावर असलेल्या आकर्षीने पात्रता फेरीत सर्वप्रथम आपलीच देशवासी असलेल्या श्रीयांशी वालिशेट्टीचा 21 -19, 17-21, 21-13 अशा गुणांनी पराभव केला. त्यानंतरच्या फेरीत तिने चीन तैपेईच्या ली वाय.एच. हिचा 21-17, 21-19 ने पराभव करत मुख्य फेरीत स्थान पक्के केले. मुख्य फेरीत तिचा सामना सिंगापूरच्या येओ जिया मिन हिच्याशी होईल. पुरूष एकेरीच्या पात्रता फेरीत, एस. सुब्रमण्यन याला मलेशियाच्या ली झी जियाकडून 12-21, 18-21 अशा गुणांनी पराभव पत्करावा लागला. ली झी जिया हा पॅरिस ऑलिम्पिकमधील कांस्यपदक विजेता असून दुखापतींनी गाजलेल्या 2025 च्या हंगामात पाठीवर शस्त्रक्रियेऐवजी पुनर्वसनावर भर दिल्यानंतर तो सध्या स्पर्धेत पुनरागमन करण्याचा प्रयत्न करत आहे. महिला दुहेरीमध्ये भारताची जोडी अश्विनी भट के., आणि शिखा गौतम यांनी जपानच्या रुई हिरोकामी आणि सायका होबारा या जोडीला पुढे चाल दिली.

## कोहली, भुवनेश्वर कुमार, पडिक्कल आरसीबी शिबिरात दाखल

**बेंगळूर/वृत्तसंस्था :** भारतीय क्रिकेटचा दिग्गज चेहरा विराट कोहली आणि स्टार खेळाडू भुवनेश्वर कुमार व देवदत्त पडिक्कल हे इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) 2026 च्या हंगामापूर्वी संघाच्या शिबिरात दाखल झाले आहेत.



आरसीबी आपल्या विजेतेपदाच्या बचावाची सुरूवात बेंगळूर येथील त्यांच्या घरच्या मैदानावर, एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर सनरायझर्स हैदराबाद (एसआरएच) विरुद्ध करेल. महिला संघ सध्याच्या वूमन्स प्रमीयिर लीग (डब्ल्यूपीएल) स्पर्धेचा विजेता असल्याने पुरूष संघाचेही लक्ष्य हे विजेतेपद कायम राखणे आणि आरसीबीच्या अलिकडील सुवर्णकाळाची घोडदौड पुढे चालू ठेवणे हेच असेल. सध्या आरसीबी हे भारतीय फ्रँचायझी क्रिकेटचे किंग आणि क्वीन्स आहेत. कारण आयपीएल आणि डब्ल्यूपीएल या दोन्ही स्पर्धांच्या ट्रॉफी एकाचवेळी आपल्याकडे बाळगणारा हा पहिलाच संघ ठरला आहे.

किंग आपल्या राज्यात दाखल झाल्याची चिन्हे खरोखरच दिसून येत होती. कारण वाहतूक सिग्नलवर त्याचा जर्सी क्रमांक असलेला 18 हा आकडा प्रदर्शित करण्यात आला होता आणि चाहतेही विराटसोबत फोटो काढण्याची संधी मिळविण्यासाठी धावपळ करताना दिसून आले. आयपीएलमध्ये सर्वाधिक धावा करणारा हा फलंदाज आता अधिक मुक्तपणे आणि निर्भयपणे खेळेल. कारण गेल्या हंगामात अहमदाबाद येथे झालेल्या विजेतेपदाच्या अटीतटीच्या लढतीत पंजाब किंग्जला पराभूत करुन, त्याने अखेर बहुप्रतिक्षीत विजेतेपद पटकावले आणि आपल्यावरील मोठा मानसिक दबाव दूर केला.

सध्या 267 सामन्यांमध्ये 8661 धावा, 8 शतके आणि 63 अर्धशतके अशी कामगिरी असलेल्या विराटचे लक्ष्य आयपीएलच्या इतिहासात 9000 धावांचा टप्पा गाठणारा पहिला खेळाडू बनणे हे देखील असेल. आयपीएल आणि आता बंद झालेली चॅम्पियन्स लीग टी-20 या दोन्ही स्पर्धांमध्ये आरसीबीकडून 282 सामन्यांत 9085 धावा केलेल्या विराटला टी-20 क्रिकेटच्या इतिहासात एकाच आयपीएल संघासाठी 10000 धावा करणारा पहिला खेळाडू बनण्यासाठी केवळ एका असाधारण हंगामाची आवश्यकता आहे. 414 टी-20 सामन्यांमध्ये 9 शतके आणि 105 अर्धशतकांसह 13543 धावा करणाऱ्या विराटचे लक्ष्य आता टी-20 क्रिकेटमधील 14000 धावांच्या क्लबचा पाचवा सदस्य बनण्याचे असेल. या क्लबमध्ये वेस्ट इंडिजचे दिग्गज ख्रिस गेल (14562 धावा) आणि कायरोन पोलार्ड (14482) धावा, इंग्लंडचा ॲलेक्स हेल्स (14449 धावा) आणि ऑस्ट्रेलियाचा महान खेळाडू डेव्हिड वॉर्नर (14028) धावा यांचा समावेश आहे. गेल्या हंगामात विराटचे 5 डावांमध्ये 54.75 च्या सरासरीने आणि 144.71 च्या स्ट्राईक रेटने 657 धावा केल्या होत्या. यामध्ये त्याच्या नावावर आठ अर्धशतके जमा होती. या कामगिरीसह तो संघाचा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला तसेच एकूण धावांच्या बाबतीत तो तिसऱ्या क्रमांकावर राहिला.

# दक्षिण आफ्रिकेला हरवत न्यूझीलंडच्या क्रिकेट संघाने केली मालिकेत बरोबरी

## देव्हॉन कॉनवे सामनावीर, सिअर्स-फर्ग्युसनचे प्रत्येकी ३ बळी



**हॅमिल्टन/वृत्तसंस्था :** 'सामनावीर' देवॉन कॉनवेचे अर्धशतक तसेच लॉकी फर्ग्युसन, बेन सीअर्स आणि सँटनर यांच्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर यजमान न्यूझीलंडने मंगळवारी येथे खेळविण्यात आलेल्या दुसऱ्या सामन्यात द. आफ्रिकेचा 68 धावांनी पराभव करत 5 सामन्यांच्या टी-20 मालिकेत 1-1 अशी बरोबरी साधली.

या मालिकेतील पहिला सामना द. आफ्रिकेने जिंकून आघाडी मिळविली होती. या दुसऱ्या सामन्यात द. आफ्रिकेने नाणेफेक जिंकून न्यूझीलंडला प्रथम फलंदाजी दिली. न्यूझीलंडने 20 षटकांत 6 बाद 175 धावा जमविल्या. त्यानंतर द. आफ्रिकेचा डाव 15.3 षटकांत 107 धावांत आटोपला. न्यूझीलंडच्या देव्हॉन कॉनवेने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील 6 हजार धावांचा टप्पा ओलांडला. कॉनवे आणि टॉम लॅथम या सलामीच्या जोडीने 39 चेंडूत 48 धावांची भागिदारी केली. द. आफ्रिकेच्या अचूक गोलंदाजीसमोर दुसऱ्या बाजूने न्यूझीलंडचे फलंदाज ठराविक अंतराने बाद होत असताना कॉनवेने समयोचित खेळी करत आपल्या संघाला विजय मिळवून दिला. कॉनवेने 49 चेंडूत 2 षटकार आणि 5 चौकारांसह 60 तर लॅथमने 1 षटकार आणि 1 चौकारासह 11, निक केलीने 12 चेंडूत 4 चौकारांसह 21, कर्णधार सँटनरने 14 चेंडूत 1 षटकार आणि 2 चौकारांसह 20 धावा जमविल्या. मॅकॉंची आणि क्लार्कसन या जोडीने सातव्या गड्यासाठी अभेद्य 35 धावांची भागिदारी केल्याने न्यूझीलंडला 175 धावांपर्यंत मजल मारता आली. मॅकॉंचीने 12 चेंडूत 1 षटकार आणि 1 चौकारासह नाबाद 18 तर क्लार्कसनने 9 चेंडूत 2 षटकार आणि 2 चौकारांसह नाबाद 26 धावा जमविल्या. न्यूझीलंडच्या डावात 7 षटकार आणि 15 चौकार नोंदविले गेले. द. आफ्रिकेतर्फे मुल्डेरने 14 धावांत 2 तर कोएत्झी, मोकोएना, केशव महाराज आणि लिन्डे यांनी प्रत्येकी 1 गडी बाद केला. न्यूझीलंडने पॉवरप्ले दरम्यानच्या 6 षटकांत 43 धावा जमविल्या तर कॉनवेने 2 षटकार आणि 5 चौकारांसह 39 चेंडूत अर्धशतक झळकविले.

प्रत्युत्तरादाखल खेळताना न्यूझीलंडच्या शिस्तबद्ध आणि भेदक गोलंदाजीसमोर द. आफ्रिकेचा डाव 15.3 षटकांत 107 धावांत आटोपला. जॉर्ज लिन्डेने सर्वाधिक म्हणजे 12 चेंडूत 3 षटकार आणि 3 चौकारांसह 33, रुबन हर्मनने 12 चेंडूत 1 षटकार आणि 2 चौकारांसह 19, निक स्मिथने 1 चौकारासह 12, फॉरेस्टरने 1 चौकारासह 10 धावा केल्या. मुल्डरने 20 चेंडूत 1 षटकार आणि 1 चौकारासह 16 धावा जमविल्या. द. आफ्रिकेच्या डावात 6 षटकार आणि 8 चौकार नोंदविले गेले. द. आफ्रिकेने पॉवरप्ले दरम्यानच्या 6 षटकांत 31 धावा जमविताना 2 गडी गमविले. न्यूझीलंडतर्फे फर्ग्युसनने 16 धावांत 3, सिअर्सने 14 धावांत 3, सँटनरने 19 धावांत 2 तर मॅकॉंची आणि नीशम यांनी प्रत्येकी 1 बळी घेतला. आता या मालिकेतील तिसरा सामना 20 मार्च रोजी ऑकलंडमध्ये खेळविला जाईल.

# गळ्यात कवड्याची माळ, कपाळाला मळवट; गश्मीरचा नव्या अवतारातला थरारक 'गोंधळ'



मराठी चित्रपटसृष्टीत सध्या चर्चेत असलेल्या 'सालबर्डी' या आगामी चित्रपटातील 'गोंधळ' गीतामुळे अभिनेता गश्मीर महाजनी पुन्हा एकदा लक्षवेधी ठरला आहे. येत्या १७ एप्रिल रोजी प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटात गश्मीर एका पारंपरिक गोंधळीच्या भूमिकेत दिसणार असून त्याच्या दमदार सादरीकरणाने प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

गोंधळी ही महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीतील एक महत्त्वाची परंपरा मानली जाते. गावोगावी फिरून आई जगदंबेचा जागर करणाऱ्या या कलाकारांची भक्ती आणि ऊर्जा मनाला स्पर्श करणारी असते. याच पार्श्वभूमीवर 'सालबर्डी' चित्रपटात सादर करण्यात आलेले गोंधळ गीत प्रेक्षकांना एक वेगळाच अनुभव देत आहे. "काळरातीचा जोर वाढला घोर..." या ओळींनी सजलेल्या या गीतात गश्मीरने पारंपरिक वेशभूषा, प्रभावी देहबोली आणि ऊर्जादायी नृत्याचा संगम साकारला आहे.

नुकतेच प्रदर्शित झालेले हे गाणे सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून प्रेक्षकांकडून त्याला जोरदार प्रतिसाद मिळत आहे. संबळाच्या ठेक्यावर सादर होणाऱ्या या गोंधळामुळे चित्रपटातील रहस्यमय वातावरण अधिक गडद होत असल्याचे दिसते. गाण्याचे गीतकार मुकुंद भालेराव असून संगीतकार पद्मनाभ गायकवाड यांनी त्याला आकर्षक संगीत दिले आहे. गायक अजय गोगावले यांच्या दमदार आवाजामुळे गाण्याची प्रभावीता अधिक वाढली आहे, तर नृत्यदिग्दर्शन आशिष पाटीलने केले आहे.

या भूमिकेबद्दल बोलताना गश्मीर महाजनी म्हणाला की, "गोंधळ ही केवळ परंपरा नसून देवीभक्तीची ऊर्जादायी अभिव्यक्ती आहे. 'सालबर्डी'मधील माझी भूमिका कथानकाला वेगळी दिशा देणारी आहे. या गाण्याचे शूटिंग करताना अंगावर रोमांच उभे राहत होते, आणि तो अनुभव प्रेक्षकांपर्यंत पोहोचेल याची मला खात्री आहे." 'सालबर्डी' हा चित्रपट महाराष्ट्रातील दुर्गम भागात घडणाऱ्या रहस्यमय घटनांवर आधारित आहे. नेब्यूला फिल्म्सच्या बॅनरखाली साकारलेल्या या चित्रपटाची निर्मिती अनिल देवडे पाटील, डॉ. गजानन जाधव आणि राम जाधव यांनी केली असून दिग्दर्शन रमेश साहेबराव चौधरी यांनी केले आहे. पूजा सावंत, शशांक शेंडे, ओंकार भोजने, भारत गणेशपुरे यांसह अनेक कलाकार या चित्रपटात झळकणार आहेत.

# एक फ्लॅट, दोन कुटुंब...; निर्मिती सावंतच्या 'सुपर डुपर'चा धमाकेदार ट्रेलर प्रदर्शित

यंदाच्या उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये प्रेक्षकांसाठी धमाल मनोरंजनाची मेजवानी घेऊन येणाऱ्या 'सुपर डुपर' या मराठी चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला आहे. नावाप्रमाणेच ट्रेलरही 'सुपर डुपर' ठरला असून प्रेक्षकांकडून त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. झी स्टुडिओज प्रस्तुत, नाईंटी नाईन प्रॉडक्शन्स आणि सिद्धिविनायक प्रॉडक्शन्स निर्मित या चित्रपटाचे दिग्दर्शन समीर आशा पाटील यांनी केले आहे. हा चित्रपट येत्या ३ एप्रिल रोजी प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे.

ट्रेलर लॉंच सोहळा अत्यंत दिमाखात पार पडला. ट्रेलरमध्ये एका घराभोवती फिरणारा मजेशीर गोंधळ दाखवण्यात आला आहे. एका बाजूला परंपरांना जपणारे गावाकडील कुटुंब, तर दुसऱ्या बाजूला आधुनिक विचारसरणी असलेले शहरातील तरुण जोडपे—अशा दोन भिन्न स्वभावाच्या कुटुंबांची गोष्ट यात रंगवण्यात आली आहे. योगायोगाने एकाच फ्लॅटची विक्री या दोघांनाही होते आणि याच कारणावरून वाद निर्माण होतो. एकाच घरात राहण्याची वेळ आल्यावर त्यांच्या सवयी, विचार आणि जीवनशैलीतील फरकांमुळे अनेक विनोदी प्रसंग घडताना दिसतात.




या सगळ्या गमतीदार गोंधळात 'झाड उगायला माती आणि माणूस जगायला नाती लागतातच' हा निर्मिती सावंत यांच्या तोंडी असलेला संवाद विशेष लक्ष वेधून घेतो. विनोदासोबतच नात्यांमधील ऊब आणि भावनिक क्षणांचा सुंदर संगम ट्रेलरमध्ये पाहायला मिळतो. चित्रपटात निर्मिती सावंत, शशांक शेंडे, हृषिकेश जोशी, नम्रता संभेराव, कुशल बद्रिके, प्रतीक्षा कोते यांच्यासह ललित प्रभाकर आणि विदुला चौगुले हे कलाकार प्रमुख भूमिकेत झळकणार आहेत.तर, छायांकनाची जबाबदारी संजय जाधव यांनी सांभाळली आहे.

दिग्दर्शक समीर आशा पाटील यांनी सांगितले की, हा चित्रपट केवळ विनोदी नसून नात्यांमधील भावनिक बाजूही हलक्या-फुलक्या पद्धतीने मांडतो. तर झी स्टुडिओज् मराठीचे व्यवसाय प्रमुख बवेश जानवलेकर यांनीही हा चित्रपट संपूर्ण कुटुंबाने एकत्र अनुभवावा, असा विश्वास व्यक्त केला आहे. ३ एप्रिलपासून प्रदर्शित होणारा 'सुपर डुपर' हा चित्रपट यंदाच्या उन्हाळ्यात प्रेक्षकांसाठी एक खास कौटुंबिक मनोरंजनाचा अनुभव ठरणार आहे.

# शिवआशिष मिश्राचा समृद्धी महामार्गावर भीषण अपघात; कारचा अक्षरशः चुराडा

बिग बॉस सीझन १२ मधील स्पर्धक म्हणून ओळखला जाणारा इन्फ्लुएंसर आणि अभिनेता शिवआशिष मिश्रा याचा समृद्धी महामार्गावर भीषण अपघात झाला आहे. नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्याच्या हद्दीत ही घटना घडली असून या अपघातात मिश्रा गंभीर जखमी झाला आहे. त्याच्यासोबत असलेला सहकारी गंभीर दुखापत झाली असल्याची माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, समृद्धी महामार्गावरून प्रवास करत असताना अचानक वाहनाचा अपघात झाला. अपघात इतका भीषण होता की, मिश्रा याला गंभीर दुखापत झाली. विशेषतः त्याच्या बरगड्यांना मोठी दुखापत झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे. घटनेनंतर तातडीने स्थानिकांनी आणि आपत्कालीन सेवांनी मदत करत जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल केले.




प्राथमिक उपचारासाठी शिवआशिष मिश्रा याला कोपरगाव येथील रुग्णालयात नेण्यात आले. तेथे डॉक्टरांनी त्याची प्रकृती पाहून पुढील उपचारासाठी नागपूर येथे हलवण्याचा निर्णय घेतला. सध्या त्याच्यावर नागपूरमध्ये उपचार सुरू असून त्याची प्रकृती स्थिर असल्याचे सांगितले जात आहे. या अपघातामुळे चाहत्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. शिवआशिष मिश्रा हा 'बिग बॉस' सीझन १२ मधून प्रसिद्धीझोतात आला होता. त्याच्या फिटनेसमुळे त्याने प्रेक्षकांचे लक्ष वेधले होते. या अपघाताची माहिती समोर आल्यानंतर त्याच्या चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. दरम्यान, अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिसांकडून या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.

# नोरा फतेहीने 'सरके चुनर' या अश्लील गाण्यावर सोडलं मौन

नोरा फतेही 'सरके चुनर तेरी सरके' या अश्लील गाण्यामुळे चांगलीच ट्रोल होत आहे. नोराने 'सरके चुनर ' या गाण्यावर आपली पहिली प्रतिक्रिया दिली आहे. नोराने निर्मात्यांवर गंभीर आरोप केले आहे.

नोरा फतेही 'सरके चुनर तेरी सरके' गाण्यामुळे प्रचंड ट्रोल होत आहे. हे गाणे 'केडी - द डेव्हिल' चित्रपटातील आहे. या गाण्यावर कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. या गाण्यात अश्लील शब्द तसेच अश्लील डान्स स्टेप्समुळे मोठा वाद निर्माण झाला आहे. 'सरके चुनर तेरी सरके' गाण्याचे संगीत दिग्दर्शक अर्जुन जान्या आहेत. गीत रकीब आलम यांनी लिहिले आहे आणि हे गाणे गायक मंगली यांनी गायले आहे. आता या गाण्यावर बॉलिवूड अभिनेत्री आणि डान्सर नोरा फतेहीने आपली पहिली प्रतिक्रिया दिली आहे. तिने निर्मात्यांवर गंभीर आरोप केले आहे.

व्हिडीओमध्ये नोरा फतेहीने म्हटल्यानुसार, नोराने 'सरके चुनर' हे गाणे तीन वर्षांपूर्वी कन्नड भाषेत शूट केले आहे. अभिनेते संजय दत्त झळकणार असल्यामुळे तिने या गाण्याला होकार दिला. तिला मोठ्या अभिनेत्यासोबत काम करण्याची संधी मिळाली. गाण्याच्या भाषांतराबद्दल सर्व निर्मात्यांवर अवलंबून असते. नोराला कन्नड समजत नसल्याने तिने निर्मिते जे सांगत आहे, त्यावर विश्वास ठेवला. या गाण्याने हिंदी बोल खूप वाईट असल्याचे नोराने स्वतःने सांगितले आहे. तसेच या सर्वांची नोराला काहीच कल्पना नव्हती. नोराला हिंदी डबिंग विषयी काही माहिती नव्हते. तिला थेट लॉंच इव्हेंटमध्ये समजले. नोरा फतेही व्हिडीओत म्हणाली की, "निर्मात्यांनी माझ्या परवानगीशिवाय हिंदीत व्हिडिओ बनवला. त्यानंतर त्यांनी माझा आणि संजय दत्त यांचा AI जनरेटेड फोटो तयार केला. " नोराला हिंदी समजत असल्यामुळे तिला गाण्याच्या लॉंच दरम्यान हे सर्व चुकीचे असल्याचे वाटले. त्यानंतर नोरा दिग्दर्शकाला बोलायला गेली. त्याला सांगितले की, "हे चुकीचे आहे. यावर प्रचंड टीका होणार...माझी प्रतिष्ठा पणाला लागली आहे..." शेवटी नोरा म्हणाली की, "मी काय नेपो किड नाही. मला पाठिंबा देणारे, माझ्यावर प्रेम करणारे फक्त माझे प्रेक्षक आणि माझे चाहते आहेत. मी तुम्हाला विनंती करते की हे गाणे कुठेही शेअर करू नका... माझ्या चारित्र्यावर वाईट बोलणे थांबवा. मी भविष्यात कोणताही प्रोजक्ट निवडताना अधिक काळजी घेईन. "





# मेहकर तालुक्यात वादळी वाऱ्यासह गारपीट

जनसंचलन/मेहकर

तालुक्यात गुरुवारी झालेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस आणि गारपिटीने शेतकऱ्यांच्या तोंडचा घास हिरावून घेतला आहे. मोहना बुद्रुक शिवारात या नैसर्गिक आपत्तीमुळे उभ्या पिकांचे प्रचंड नुकसान झाले असून शेतकरी हवालदिल झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मोहना बुद्रुक येथील सुलोचनाबाई पवार गणेश करे व इतर शेतकरी यांच्या शेतातील काढणीला आलेले गव्हाचे पीक गारपिटीमुळे अक्षरशः जमीनदोस्त झाले आहे. यामुळे त्यांचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे. तसेच तुळशीराम पवार गट नंबर ८७. सुभाष चव्हाण गट नंबर १४२ शिलाबाई राठोड गट नंबर १४३ गणेश करे, प्रवीण जाधव आणि परिसरातील इतर शेतकऱ्यांच्या गहू कांदा पिकालाही या गारपिटीचा मोठा फटका बसला आहे. केवळ पिकांचेच नव्हे, तर शेतीमधील साहित्याचेही मोठे नुकसान झाले आहे. गणेश श.




जाधव यांच्या शेतातील सौर ऊर्जा प्लेट्स ( ) गारपिटीमुळे फुटून त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. अचानक आलेल्या या संकटामुळे पिकांचे नुकसान डोळ्यादेखत पाहण्यापलीकडे शेतकऱ्यांच्या हातात काहीच उरले नाही. शासनाने आणि महसूल विभागाने या नुकसानीची दखल घेऊन तत्काळ पंचनामे करावेत आणि बाधीत शेतकऱ्यांना लवकरात लवकर नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी मोहना बुद्रुक येथील संतप्त आणि हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

# मिशन लक्ष्यवेध योजनेअंतर्गत खेळाडू निवड चाचणी ५ एप्रिलला

जनसंचलन/बुलढाणा

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या मिशन लक्ष्यवेध योजना अंतर्गत जिल्हास्तर क्रीडा निपुणता केंद्रासाठी खेळाडू निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. ही चाचणी दि. ५ एप्रिल २०२६ रोजी जिल्हा क्रीडा संकुल, जांभरून रोड, बुलढाणा येथे होणार आहे. या योजनेअंतर्गत बुलढाणा येथे वेटलिफ्टिंग व मैदानी (ॲथलेटिक्स) या क्रीडा प्रकारांसाठी निवासी स्वरूपाचे क्रीडा निपुणता केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. निवड झालेल्या खेळाडूंना दर्जेदार प्रशिक्षण, क्रीडा साहित्य, अल्पोहार तसेच क्रीडा विज्ञान विषयक सहाय्य शासन मान्यतेनुसार उपलब्ध करून दिले जाणार आहे. जिल्ह्यातील पात्र व गुणवंत खेळाडूंना प्रगत प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने ही निवड प्रक्रिया राबविण्यात येत आहे. इच्छुक खेळाडूंनी दि. १ एप्रिल २०२६ सायंकाळी ६ वाजेपर्यंत निर्धारित नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रांसह सादर करावा. निवड निकष : खेळाडू हा ३१ डिसेंबरपर्यंत २१ वर्षांखालील मुलगे/मुली, महाराष्ट्र राज्यातील खेळाडू असणे आवश्यक, राज्यस्तरीय पदक विजेते किंवा राष्ट्रीय स्तरावर सहभागी (, , ) खेळाडू गत २ वर्षाच्या क्रीडा कामगिरीचे मुल्यमापन करण्यात येऊन क्रीडा कौशल्य व तंदुरुस्ती चाचण्यांमध्ये पात्र होणे आवश्यक व शासन मान्यताप्राप्त डॉक्टरांचे फिटनेस प्रमाणपत्र अनिवार्य राहिल. आवश्यक कागदपत्रे: जन्म दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, आधार कार्ड, क्रीडा कामगिरी प्रमाणपत्र, ३ फोटो, बोनाफाईड प्रमाणपत्र, पालक संमतीपत्र इत्यादी. अर्जाचा नमुना व आवश्यक कागदपत्रांचा तपशील ://./६९९ या लिंक मध्ये उपलब्ध असून इच्छुक विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रासह अर्ज जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, जांभरून रोड, बुलढाणा ४४३००१ येथे सादर करावा. तसेच अपूर्ण अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. निवड प्रक्रिया शासनाने निश्चित केलेल्या निकषांनुसार तज्ज्ञ समितीद्वारे करण्यात येणार आहे, अशी माहिती प्रसिद्धी पत्रकाव्दारे जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस. महानकर यांनी दिली.

# सुलतानपुरात जपली सामाजिक सलोख्याची परंपरा
## पायी दिंडी आणि ईद्चा झाला अपूर्व संगम!



जनसंचलन/बुलढाणा

आज देशभरात रमजान ईदचा उत्साह असतानाच, सुलतानपूर येथे सामाजिक सलोख्याचे आणि बंधुभावाचे एक अतिशय सुंदर चित्र पाहायला मिळाले. एकीकडे मुस्लिम बांधव ईदची नमाज अदा करण्यासाठी ईदगाहकडे जात होते, तर दुसरीकडे त्याच मार्गावरून हिंदू बांधवांची पायी दिंडी मार्गस्थ होत होती. या दोन वेगवेगळ्या प्रवासांचा जेव्हा संगम झाला, तेव्हा धर्माच्या भिंती ओलांडून माणुसकीचे दर्शन घडले. ईदगाहकडे जाणाऱ्या मुस्लिम तरुण बांधवांनी मोठ्या उत्साहात पायी दिंडीतील वारकरी आणि हिंदू बांधवांची भेट घेतली. यावेळी मुस्लिम बांधवांनी दिंडीतील बांधवांना मनापासून रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या. या हृदयस्पर्शी प्रसंगामुळे परिसरात आनंदाचे आणि सलोख्याचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रसंगी मोईन खान, शेख अहेमद शेख लाल, शेख वकार, अहमदनूर, तोसिफ हसन, वसीम खान, शेख इमरान, शेख शोएब या तरुण मुस्लिम बांधवांनी पुढाकार घेत ईदच्या शुभेच्छा दिल्या. सण कोणताही असो, तो आनंद आणि एकमेकांप्रती आदर घेऊन येतो, हेच या प्रसंगातून सुलतानपूरकरांनी दाखवून दिले आहे. या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# महाराष्ट्रात गेमिंग, क्रिएटर इकॉनॉमी आणि पायाभूत सुविधा उभारण्यावर भर- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

जनसंचलन/बुलढाणा

महाराष्ट्रात गेमिंग, क्रिएटर इकॉनॉमी, शिक्षण आणि डिजिटल पायाभूत सुविधा उभारण्यासाठी शासन सक्षम वातावरण निर्माण करत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना काही कंटेंट क्रिएटर्सने विचारलेल्या प्रश्नांना त्यांच्या खास शैलीत उत्तरे दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज मुंबईच्या एमएमआरडीए ग्राऊंड, बीकेसी येथे जेन ओ : पिक्सल ॲण्ड प्ले ॲण्ड ग्लोबल इस्पोर्ट गेम्स या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी त्यांच्यासोबत पर्यटन विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, मुख्यमंत्र्यांचे सल्लागार कौस्तुभ धवसे, जेन ओचे संस्थापक श्रीपाद अष्टेकर आणि ग्लोबल ई-स्पोर्ट्स फेडरेशनचे अध्यक्ष पॉल फॉस्टर उपस्थित होते. गेमिंग क्षेत्रातील करिअरविषयी विचारलेल्या प्रश्नावर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, माझ्या मुलीने गेमिंगमध्ये करिअर करायचे ठरवले, तर त्यांना १०० टक्के परवानगी आणि पूर्ण पाठिंबा असेल. कोणतेही क्षेत्र निवडले तरी मेहनत हीच यशाची गुरुकिल्ली असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री कार्यालयाचे २४७ लाईव्ह स्ट्रीमिंग करण्याबाबत विचारले असता मुख्यमंत्र्यांनी सांगितले केले की, मुख्यमंत्री ऑफिसद्वारे मोठे प्रकल्प आणि महत्वाचे निर्णय लोकांसमोर लाईव्ह प्लॅटफॉर्मवर मांडण्याचा प्रयत्न करू, असे त्यांनी नमूद केले. कंटेंट क्रिएटर्सना भेडसावणाऱ्या व्ह्यूज टू व्हॅल्यू या समस्येबाबत बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, राज्य शासन क्रिएटर्स आणि ब्रँड्स यांच्यातील दरी कमी करण्यासाठी प्रयत्नशील आहे. अलीकडेच यूट्यूबचे सीईओ नील मोहन यांच्यासोबत चर्चा झाली असून, क्रिएटर्ससाठी मजबूत इकोसिस्टम तयार करण्यावर भर दिला जात आहे, असे त्यांनी सांगितले. तसेच एव्हीजीसी () धोरणाद्वारे क्रिएटर इकॉनॉमीला चालना दिली जात असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. विद्यार्थ्यांसाठी कंटेंट क्रिएटिव्ह क्षेत्रात औपचारिक शिक्षणाच्या संधी वाढवण्याबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी () स्थापन करण्यात आले असून, हब-अँड-स्पोक मॉडेलद्वारे प्रशिक्षण आणि इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध करून दिले जाईल. त्यामुळे विद्यार्थ्यांना गेमिंग, ॲनिमेशन आणि व्हिज्युअल इफेक्ट्समध्ये करिअरची



स्पष्ट दिशा मिळणार आहे.ग्रामीण भागातील इंटरनेट सुविधांबाबत त्यांनी सांगितले की, राज्यातील ४० हजार गावांपैकी सुमारे ७० टक्के गावांमध्ये फायबर नेटवर्क पोहोचले आहे. पुढील दोन ते तीन वर्षांत प्रत्येक गावात उच्चगती इंटरनेट उपलब्ध करून देण्याचा सरकारचा मानस आहे. त्यामुळे गेमर्सना लॅग-फ्रीफ अनुभव मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. आंतरराष्ट्रीय दर्जाचे गेम्स तयार करण्याबाबतही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रात १२ एव्हीजीसी हब्स विकसित केले जात असून, त्याद्वारे जागतिक दर्जाचे गेम्स तयार करण्यासाठी आवश्यक इकोसिस्टम उभी केली जाणार आहे. याशिवाय, नवी मुंबई विमानतळाजवळ ५० एकर जागेवर कंटेंट क्रिएटर्ससाठी अत्याधुनिक कॉम्प्लेक्स उभारण्याची योजना असल्याचेही त्यांनी जाहीर केले. येथे ई-स्पोर्ट्स, कंटेंट क्रिएशन आणि संबंधित सर्व सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध असतील.

# जिल्ह्यातील ५९ ग्रामपंचायतींमधील रिक्त पदांसाठी पोटनिवडणूका जाहीर

## नामनिर्देशन पत्र ७ ते १३ एप्रिल दरम्यान दाखल करता येणार २८ एप्रिल रोजी मतदान

## आदर्श आचारसंहीतेचे काटेकोर पालन करावे




जनसंचलन/बुलढाणा

राज्य निवडणूक आयोगाकडून घोषीत केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार जिल्ह्यातील १३ तालुक्यांतील ५९ ग्रामपंचायतींच्या रिक्त थेट सरपंच व सदस्यांच्या पोट निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. या ग्रामपंचायतींमध्ये १७ मार्च २०२६ च्या मध्यरात्रीपासून आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. निवडणूक आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. आयोगाच्या आदर्श आचार संहीता त्या-त्या ठिकाणच्या निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अस्तित्वात राहणार आहे. या क्षेत्रातील मतदारांवर विपरीत प्रभाव टाकणारी कोणतीही कृती, घोषणा मंत्री, खासदार, आमदार व संबंधित स्थानिक संस्थेतील पदाधिकाऱ्यांना आचारसंहीता कालावधीत कुठेही करता येणार नाही. निवडणूक कार्यक्रम याप्रमाणे : निवडणूकीची अधिसूचना सोमवार दि. ३० मार्च २०२६ रोजी संबधित तहसिल कार्यालय व ग्रामपंचायत कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल. या कार्यक्रमानुसार निवडणुकीकरीता नामनिर्देशनपत्र दि. ७ ते १३ एप्रिल २०२६ पर्यंत सकाळी ११ वाजेपासून ते दुपारी ३ वाजेदरम्यान स्वीकारले जाणार आहे. नामनिर्देशन पत्र छाननी बुधवार दि. १५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजूपासून छाननी संपेपर्यंत. दि. १७ एप्रिल २०२६ रोजी नामनिर्देशन अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत ठेवण्यात आली आहे. या निवडणूकीचे मतदान मंगळवार दि. २८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायं ५.३० वाजेपर्यंत होणार असून मतमोजणी बुधवार दि. २९ एप्रिल २०२६ रोजी करण्यात येणार आहे, असे जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रसिद्धी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# निकृष्ट ज्वारी तपासच संशयाच्या भोवऱ्यात; पथकाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न


जनसंचलन/बुलडाणा



सार्वजनिक वितरण व्यवस्थेत निकृष्ट, कीडग्रस्त ज्वारी वाटपाच्या गंभीर प्रकरणात आता तपासच संशयाच्या भोवऱ्यात सापडल्याची चर्चा आहे. विभागीय आयुक्त कार्यालय, मंत्री छगन भुजबळ आणि केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्याकडे तक्रारींचा भडिमार झाल्यानंतर अमरावतीचे प्रभारी पुरवठा अधिकारी निनाद लांडे व त्यांच्या समवेत दोन अधिकारी शुक्रवारी (दि. २०) मोताळा येथे चौकशीसाठी दाखल झाले; मात्र त्यांच्या कार्यपद्धतीमुळे नव्याने शंका निर्माण झाल्या आहेत. स्वस्त धान्य दुकानदार संघटना व नागरिकांकडून निकृष्ट ज्वारीच्या वाटपाबाबत सातत्याने आवाज उठवला जात होता. आमदार श्वेता महाले यांनीही विधिमंडळात हा मुद्दा उपस्थित केला होता. जिल्ह्यातील २१ खरेदी केंद्रांत कारवाई केल्याचे प्रशासनाने जाहीर केले असले, तरी प्रत्यक्ष दोषींवर ठोस कारवाई झाल्याचे चित्र दिसत नाही. या निकृष्ट ज्वारीचे लाभार्थ्यांना वितरण; २१ खरेदी केंद्रांवर बंदी मार्च नियतनातील ज्वारीवर प्रश्नबिन्ह वितरण थांबवण्याची मागणी चौकशीसाठी न बोलावणे, नमुन्यांचा पंचनामा न करणे आणि कार्डधारक किंवा स्थानिकांकडून माहिती न घेता केवळ वरवरची पाहणी करून परतणे, या बाबींमुळे तपासाची विश्वासार्हता धोक्यात आल्याचे सांगितले जात आहे. अधिकच गंभीर म्हणजे, गोदामातील प्रत्यक्ष साठ्याची मोजणी न करता ते सीलही करण्यात आले नाही, असे स्थानिकांचे म्हणणे आहे. या निष्काळजीमुळे पुरावे नष्ट होण्याची, तसेच ज्वारीतील तुटीचे प्रकरण दडपण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी प्रतिक्रिया तक्रारकर्त्यांकडून व्यक्त होत आहे. गोदाम व्यवस्थापकाला दप्तरासह अमरावतीला बोलावण्याचा निर्णयही संशय वाढवणारा ठरत आहे. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी खरेदी प्रक्रियेत त्रुटी असल्याचे मान्य करत, २१ केंद्रांवर कारवाई केल्याचे यापूर्वी सांगितले होते; तरीही प्रत्यक्ष जबाबदारांवर कारवाईची गती संथ असल्याचे दिसून येत आहे. यामुळे संपूर्ण प्रकरणात कोणाला वाचवले जात आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. अन्नसुरक्षेशी निगडित या प्रकरणात वरवरची चौकशी न करता सखोल, पारदर्शक व जबाबदारी निश्चित करणारी कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. पार्श्वभूमीवर चौकशीसाठी आलेल्या पथकाने गोदामाला भेट देऊन ज्वारीचे नमुने घेतले

# शासकीय दर जाहीर होताच आठवडी बाजार लिलावात गोंधळ; प्रक्रिया स्थगित !

जनसंचलन/बुलडाणा



येथील मलकापूर पांगरा आठवडी बाजाराच्या २०२५-२६ वर्षाच्या लिलाव प्रक्रियेत शासकीय दर व नियमावली जाहीर होताच व्यापारी व इच्छुक लिलावधारकांनी तीव्र गदारोळ करत लिलाव रद्द करण्यास भाग पाडले. ही घटना शुक्रवारी (दि. २०) ग्रामसचिवालयात घडली. मागील वर्षी हा लिलाव ६.६८ लाख रुपयांत झाला होता. यंदा शासकीय दर सुमारे ५.७० लाख रुपये निश्चित करण्यात आला, तसेच प्रति दुकानदार २५ ते ४० रुपये वसुलीची अट सांगितली गेली; मात्र प्रत्यक्षात जादा वसुली होत असल्याचा आरोप करत व्यापाऱ्यांनी दर कमी करण्याची मागणी लावून धरली. लहान विक्रेते व शेतकऱ्यांवर लाख रुपये दर निश्चित केला गेला होता असल्याची नाराजी यावेळी व्यक्त वाढत्या वसुलीचा ताण येत करण्यात आली. लिलावधारकांकडून शासकीय नियमांनुसार वसुली होत नाही, पावती दिली जात नाही. जागावाटपातही गोंधळ असून त्यामुळे विक्रेते कमी होत आहेत, अशी टीका ग्रामपंचायत सदस्य नामदेव उगले यांनी केली. परिस्थिती चिघळताच प्रशासनाने लिलाव प्रक्रिया स्थगित केली. मागील तीन वर्षाच्या लिलावानुसार शासकीय निश्चित होतो. पुन्हा लिलाव न झाल्यास ग्रामपंचायतीलाच दर बाजाराची वसुली करावी लागेल, असे ग्रामविकास अधिकारी उद्धव गायकवाड यांनी स्पष्ट केले. या घटनेमुळे आठवडी बाजार व्यवस्थापनाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, पुढील निर्णयाकडे व्यापारी व नागरिकांचे लक्ष लागले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८